महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन-०७२३/ प्र.क्र.२५७/पोल-७, दिनांक २५ जूलै, २०२५

**विषय** :- मंजूर विकास योजना-नवीन चंद्रपूर आरक्षण क्र. ११० मधील क्षेत्रफळ ८.३० हे. आर.व आरक्षण क्र. १३३ मधील क्षेत्रफळ १२.२५ हे.आर.जागेचे भूसंपादन करण्याकरीता प्रशासकिय मान्यता

********

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन-०७२३/ प्र.क्र.२५७/पोल-७ दिनांक २५ जुलै, २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७२५१७४३४६५३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-08-2025 10:11:55
( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.),महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.
कार्यासन क्रमांक. २७

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**मंजूर विकास योजना- नवीन चंद्रपूर आरक्षण क्र. ११० मधील क्षेत्रफळ ८.३० हे. आर. व आरक्षण क्र. १३३ मधील क्षेत्रफळ १२.२५ हे. आर. जागेचे भूसंपादन करण्याकरीता प्रशासकिय मान्यता**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. जमीन-०७२३/प्र.क्र.२५७/पोल-७**
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०००३२
दि. २५ जूलै, २०२५

**संदर्भ -** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२७/ लेखाशिर्प - ४०७००१४२/ ५३-मोठी बांधकामे / भूसंपादन निधी मागणी/०४/२०२५, दि.०४.०७.२०२५.

**प्रस्तावना -**

नविन चंद्रपूर विकास योजनेत मौजा-कोसारा येथील आरक्षण क्र. ११० क्षेत्र ८.३० हे. आर. व मौजा दाताळा आरक्षण क्र.१३३ क्षेत्र १२.२५ हे. आर. जागा पोलीस विभाग या आरक्षणाने बाधीत आहे. सदर पोलीस विभागाकरीता आरक्षीत जागेमध्ये डॉग स्कॉड ट्रेनिंग सेंटर, पोलीस भरतीसाठी शारिरीक मैदान, ट्रेनिंग सेंटर, बी.डी.डी.एस. ट्रेनिंग सेंटर, इन-डोअर फायरींग बट, पोलीस अधिकारी/अमंलदार यांचेकरीता शासकिय निवासस्थान, बांधकाम व विविध योजना राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी चंद्रपूर, भुसंपादन (सामान्य) यांचे कडील पत्र दि.१३/०६/२०२५ अन्वये जमीनीचे भूसंपादन करणेकरीता परिगणना केली असून रक्कम रु.४३,६५,८६,०१६/- (अक्षरीं त्रेचाळीस कोटी पासष्ट लक्ष छयाऐंशी हजार सोळा रुपये फक्त) निधीची आवश्यकता असून निधी अभावी जमीनीचे भूसंपादन न झाल्यास जमिनीवरील आरक्षण व्यपगत होईल असे कळविले आहे. यामुळे नविन चंद्रपूर विकास योजनेत मौजा-कोसारा व दाताळा येथील आरक्षण क्र. ११० क्षेत्र ८.३० हे. आर. व मौजा दाताळा आरक्षण क्र. १३३ क्षेत्र १२.२५ हे. आर. या जागेचे भूसंपादन करणेकरीता रक्कम रुपये ४३,६५,८६,०१६/- (अक्षरी त्रेचाळीस कोटी पासष्ट लक्ष शह्याऐंशी हजार सोळा रुपये फक्त) खर्चास प्रशासकिय मान्यता देवून प्राधान्यक्रमाने निधी उपलब्ध होण्याची विनंती संदर्भाधिन पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास केली आहे. त्यानुसार भूसंपादन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

नविन चंद्रपूर विकास योजनेत मौजा-कोसारा येथील आरक्षण क्र. ११० क्षेत्र ८.३० हे. आर. व मौजा दाताळा आरक्षण क्र.१३३ क्षेत्र १२.२५ हे. आर. ही पोलीस विभाग या आरक्षणाने बाधीत जागा भूसंपादन करण्यासाठी रुपये ४३,६५,८६,०१६/- (अक्षरी त्रेचाळीस कोटी पासष्ट लक्ष शह्याऐंशी हजार सोळा रुपये फक्त) खर्चास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी येणारा खर्च हा मागणी क्र. बी. १०, बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च, (००) (००) (०७) पोलीसांकरिता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यावरील खर्च (४०७००१४२) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे" या लेखाशिर्पाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उप विभाग-तीन, अ.क्र.४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अनुसार प्रशासनिक विभागास दिलेल्या वित्तीय अधिकाराच्या मर्यादेच्या वरील असल्याने शासन मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७२५१७४३४६५३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2025.07.25 17:45:02 +05'30'

**(चेतन निकम)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

३) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.

४) निवड फाईल (पोल-७).